


सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

●वर्ष २४ वे ● अंक २१२ ● गुरुवार दि.२१ मे २०२६ ● नांदेड ● पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ ● पाने ४ ● किंमत १ रु.

## नीट पेपरफुटी प्रकरणी डॉ.मनोज शिरुरे यांना सीबीआयकडून अटक



### मुलासाठी पेपर खरेदीचा आरोप

लातूर:देशभर गाजत असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) ने प्रथमच एका पालकाला अटक केली आहे. लातूर येथील प्रसिद्ध बालरोग तज्ज्ञ डॉ. मनोज शिरुरे यांना सीबीआयने ताब्यात घेतल्याने शिक्षण आणि वैद्यकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. मुलाच्या भविष्यासाठी शॉर्टकटचा मार्ग स्वीकारल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे.

सीबीआयच्या माहिती-नुसार, डॉ. शिरुरे यांनी या प्रकरणातील मुख्य आरोपी शिवराज मोटेगावकर याच्याकडून नीट परीक्षेचा प्रश्नपत्रिका संच मिळवल्याचा संशय आहे. मुलासाठी पेपर मिळवण्यासाठी आर्थिक व्यवहारही झाल्याची शक्यता तपासली जात आहे. या धक्कादायक खुलाशानंतर सीबीआयने लातूरमध्ये धाडसत्र सुरू करत डॉ. शिरुरे यांच्या रुग्णालयावर छापा टाकला.डॉ. मनोज शिरुरे हे लातूर शहरातील जुना औसा रोड परिसरात सिद्धिविनायक बाल रुग्णालय चालवतात. वैद्यकीय क्षेत्रात त्यांची ओळख एक अनुभवी बालरोग तज्ज्ञ म्हणून आहे. मात्र, नीट पेपरफुटी प्रकरणातील धागेदोरे उलगडत असताना सीबीआयची चौकशी त्यांच्यापर्यंत पोहोचली. गेल्या आठ दिवसांपासून सीबीआयचे पथक लातूरमध्ये तळ ठोकून असून, आरोपी शिवराज मोटेगावकर याची कसून चौकशी केल्यानंतर अनेक महत्त्वाची माहिती समोर आल्याचे सांगितले जात आहे.सीबीआयने बुधवारी संध्याकाळी डॉ. शिरुरे यांच्या रुग्णालयावर छापा टाकून सुमारे साडेचार तास चौकशी केली. चौकशीदरम्यान त्यांना विविध प्रश्न विचारण्यात आले. त्यानंतर संशय अधिक बळावल्याने सीबीआयने त्यांना अटक केली. या कारवाईमुळे लातूरसह राज्यभरात मोठी चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, सीबीआयने डॉ. शिरुरे यांचा मोबाईल जप्त केला असून, त्यातील कॉल रेकॉर्ड, आर्थिक व्यवहार आणि संपर्कांची तपासणी केली जाणार आहे. मोटेगावकर याच्याशी त्यांचे संबंध किती जुने होते, आणखी कोणाला पेपर पुरवण्यात आला होता का, तसेच प्रश्नपत्रिका व्हायरल करण्यात त्यांचा सहभाग होता का, याचा तपास आता सीबीआयकडून केला जाणार आहे.याशिवाय, रुग्णालयातून पान ४ वर

## शेतकऱ्यांची ३० जूनपूर्वी कर्जमाफी-मुख्यमंत्री

### कर्जमाफीसाठी तडकाफडकी बँकांना थेट आदेश

मुंबई/प्रतिनिधी-शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. ३० जूनपूर्वी शेतकऱ्यांच कर्जमाफी केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. या घोषणेनंतर आता या कर्जमाफीच्या घोषणेची अंमलबजावणी नेमकी कधी होणार, याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. आता खरीप हंगाम जवळ आला आहे. हंगाम सुरू होण्याआधी लवकर ही कर्जमाफी अंमलात आली पाहिजे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात होती, त्यानंतर हा निर्णय घेणयात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत शेतकऱ्यांना दिले जाणारे क्रॉप लोन, शेतकऱ्यांची कर्जमाफी, खरीप हंगामासाठी लागणाऱ्या बियांणांची, खतांची उपलब्धता तसेच यावेळी पावसाचा अंदाज या सर्व महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. बैठकीत काही निर्णयही घेण्यात आले. याबाबत फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेऊन सविस्तर माहिती दिली.कर्जमाफीवर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आम्ही बँकांशी कर्जमाफीच्या बाबतीत चर्चा केली आहे. आपल्याला कर्जमाफी करायची आहे. बँकांनी कर्जमाफीची माहिती कोणत्या फॉरमॅटमध्ये द्यायची, कर्जमाफी कोणत्या फॉरमॅटमध्ये करायची, अशी एक चर्चा झाली आहे. आम्ही कर्जमाफीचा जो निर्णय घेतलेला आहे, तो वेळेत कसा पूर्ण करता येईल त्याचंही नियोजन करण्यात आलं आहे. यावर्षी जास्त शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र होणार आहेत.राष्ट्रीयकृत बँकांना अतिशय कडक शब्दांत सांगितलं आहे की, शेतकऱ्यांना कोणत्याही सिबीलची पान ४ वर

## रेल्वे भरती आंदोलन प्रकरणी राज ठाकरे निर्दोष



मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील रेल्वे भरतीत उत्तर भारतीयांना मोठ्या प्रमाणात संधी मिळत असल्याच्या निषेधार्थ २००८ मध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केलेल्या 'खळखट्याक' आंदोलन प्रकरणी दाखल झालेल्या गुन्ह्यातून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना ठाणे सत्र न्यायालयाने ठाकरे यांच्यासह सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. सरकारी पक्षाकडून आरोपींविरोधात ठोस पुरावे सादर करण्यात अपयश आल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले.

२००८ मध्ये रेल्वे भरती परीक्षेदरम्यान महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या आंदोलनामुळे राज्यासह देशभरात मोठी खळबळ उडाली होती. कल्याण, दादर, अंधेरी, डोंबिवली यांसारख्या रेल्वे स्थानकांवर परीक्षेसाठी आलेल्या उत्तर भारतीय उमेदवारांना मनसे कार्यकर्त्यांकडून मारहाण करण्यात आल्याचा आरोप होता. बिहार आणि उत्तर प्रदेशातून आलेल्या अनेक उमेदवारांना लक्ष्य करण्यात आले होते. काही ठिकाणी परीक्षा केंद्रांवर गोंधळ घालणे, प्रश्नपत्रिका फाडणे, रेल्वे स्थानकांवर दगडफेक आणि तोडफोड झाल्याचेही प्रकरण समोर आले होते. या घटनेत रेल्वे मालमत्तेचे मोठे नुकसान झाल्याची नोंद करण्यात आली होती.या घटनेच्या काही दिवसांपूर्वी राज ठाकरे यांनी रेल्वे भरती प्रक्रियेत बिहारी तरुणांना प्राधान्य दिले जात आहे असा आरोप करत तीव्र भूमिका घेतली होती. त्यांच्या भाषणामुळे मनसे कार्यकर्ते आक्रमक झाले आणि मराठी तरुणांना न्याय मिळावा या मागणीसाठी पान ४ वर




पोचमपाड बॅक वाटर मधील पुरग्रस्त शेतकऱ्यांना कोल्हापुरच्या धर्तीवर विशेष आर्थिक पॅकेज देण्याच्या मागणीसाठी जिल्हा शेतकरी जनआंदोलन संघर्ष समितीच्यावतीने आज शेतकऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला होता.

### नापिकीला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

नांदेड/प्रतिनिधी-शेतातील नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून एका शेतकऱ्याने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना पट्याचा तांडा ता.कंधार येथे बुधवारी घडली आहे.


भगवान गणु राठोड (वय ३५) या शेतकऱ्याने शेतीसाठी बँकेकडून कर्ज घेतले होते. नापिकीमुळे कर्जाची परतफेड करता आली नाही. बुधवारी राहत्या घरी राठोड यांनी गळफास घेवून आत्महत्या केली.

### काय म्हणतो सोशल मिडिया?




## काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी खा.रविंद्र चव्हाण व विठ्ठल पावडे यांची निवड

### शहराध्यक्षपदी अब्दुल गफार यांची वर्णी





नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीत मोठे फेरबदल करण्यात आले असून जिल्हाध्यक्षपदी खा.रविंद्र चव्हाण (नांदेड दक्षिण), विठ्ठल पावडे (नांदेड उत्तर) तर नांदेड महानगराध्यक्षपदी माजी उपमहापौर अब्दुल गफार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या पदा-धिकाऱ्यांमध्ये अंतर्गत गटबाजी मोठ्या प्रमाणात आहे. पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये समन्वय नसल्याने जिल्ह्यात काँग्रेसची मोठी पिछेहाट होवू लागली आहे. स्थानिक पातळीवरील अंतर्गत गटबाजीची गंभीर दखल घेत काँग्रेस हायकमांडने काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश पावडे (नांदेड उत्तर) व माजी आ. हणमंत पाटील बेटमोगरेकर (नांदेड दक्षिण) यांना जिल्हा-ध्यक्षपदावरुन हटविण्यात आले आहे. महानगरचे अध्यक्ष अब्दुल सत्तार यांनाही पदावरुन हटवून त्यांच्या पुत्राकडे शहराध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली.

नांदेड जिल्हा हा काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. दोन वर्षापूर्वी माजी मुख्यमंत्री व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक चव्हाण यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देवून भाजपात प्रवेश केला. त्यामुळे जिल्ह्यात काँग्रेसची ताकद कमी झाली. नगरपालिका, नगरपंचायत व महापालिका निवडणुकीत नांदेड जिल्ह्यात काँग्रेसला मोठे यश मिळू शकले नाही. काही ठिकाणी तर काँग्रेसला उमेदवारही मिळाले नाही. अशी दयनिय अवस्था पक्षाची झाली आहे. पक्षातील स्थानिक नेत्यांमध्ये बेबनाव व अंतर्गत गटबाजीमुळे पक्षाची पिछेहाट जिल्ह्यात होवू लागली आहे. एक महिन्यापूर्वी काँग्रेस हायकमांडने पक्ष निरिक्षक म्हणून वेणु गोपालराव व रविंद्र दळवी यांना नांदेड दौऱ्यावर पाठविले होते. पक्ष निरिक्षक वेणु गोपालराव यांच्या उपस्थितीत आयोजित बैठकीत स्थानिक नेत्यांमधील अंतर्गत वाद निदर्शनास आला होता. वेणु गोपालराव यांनी जिल्ह्यातील काँग्रेसच्या नेत्यांशी व पदाधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर पान ४ वर

## ''मेलेडी खाओ,खुद जान जाओ!'';राष्ट्रकारभाराचा नवा गोडवा

नांदेड:एकेकाळी टीव्हीवर एक जाहिरात यायची ''मेलेडी खाओ,खुद जान जाओ!'' तेव्हा हे वाक्य ऐकून अनेकांना प्रश्न पडायचा की, चॉकलेट खाल्लूयावर नेमकं काय कळणार आहे? चव कळणार, आनंद कळणार की, आयुष्याचं तत्त्वज्ञान? पण आजच्या राजकीय आणि सामाजिक वातावरणाने त्या वाक्याचा अर्थ इतका विशाल करून टाकला आहे की, ते आता केवळ चॉकलेटची जाहिरात राहिलेली नाही; तर एक प्रकारचं राष्ट्रीय मार्गदर्शक सूत्र बनलं आहे.

जाहिरातीसाठी कंपन्या कोट्यवधी रुपये खर्च करतात. मोठे कलाकार घेतात, सोशल मीडियावर मोहीम राबवतात, वेगवेगळे प्रयोग करतात. पण पार्लेवाल्यांनी कदाचित कधी विचारही केला नसेल की एक दिवस त्यांच्या चॉकलेटला जागतिक राजनैतिक ओळख मिळेल. जगातील देशांमध्ये संबंध अधिक दृढ करण्यासाठी होणाऱ्या दौऱ्यांमध्ये जर एखाद्या चॉकलेटचाही उल्लेख होत असेल, तर त्याला मार्केटिंगचं भाग्य म्हणायचं की आधुनिक राजनैतिक कौशल्य




हे समजण्यासाठीही बहुधा ''मेलेडी खाओ, खुद जान जाओ!''

पूर्वी देशांमध्ये हस्तकला, संस्कृती आणि ऐतिहासिक वस्तूंची देवाण-घेवाण व्हायची. पण काळ बदलला आहे. उद्या जर जागतिक परिषदेत दोन देशांमध्ये तणाव निर्माण झाला तर मध्यस्थ म्हणतील, ''भांडण थांबवा, आधी चॉकलेट खा.'' शांतता करारावर सही करण्याआधीही कदाचित विचारलं जाईल ''मेलेडी घेतली का?'' कारण आता काळ बदलला आहे. जगाला राजकारणापेक्षा गोडवा जास्त हवा आहे. बाकीचं... ''मेलेडी खाओ, खुद जान जाओ!''

इकडे राजकारणातही वातावरण रंगलेलं आहे. विरोधकांना यात कटकारस्थान दिसत आहे, तर सत्ताधाऱ्यांना जागतिक यश दिसत आहे. आपल्या देशात कोणत्याही विषयात राजकारण शोधण्याची एक विलक्षण क्षमता आहे. चहात साखर कमी पडली तरी लोक विचारतात ''यामागे कोणाचा हात आहे?'' त्याचं उत्तरही कदाचित तेच ''मेलेडी खाओ, खुद जान जाओ!''

**दृष्टीक्षेप**
**प्रदीप नागापूरकर**

मात्र या सगळ्या गोंधळात एक वर्ग शांतपणे आपलं काम करत आहे शेतकरी. कारण त्याला मेलडीपेक्षा डिझेल महत्त्वाचं वाटतं. मान्सून जवळ आला आहे. शेत नांगरायचं आहे. पूर्वी बैल होते, आता ट्रॅक्टर आहेत. पण ट्रॅक्टरला भाषणं, घोषणा आणि गोड शब्द समजत नाहीत; त्याला फक्त डिझेल समजतं.

शेतकरी जर राजकीय भाषेत बोलू लागला तर तो कदाचित म्हणेल, ''खत महाग, डिझेल महाग, पाऊस डोक्यावर... पण काळजी कशाला? मेलेडी खाओ, खुद जान जाओ!''

उद्या एखाद्या पेट्रोल पंपावर बोर्ड दिसला तरी आश्चर्य वाटू नये ''डिझेल उपलब्ध नाही;पण मेलेडीचा साठा मुबलक आहे.'' संसदेत प्रश्न विचारला जाईल ''महागाई कधी कमी होणार?'' उत्तर मिळेल ''मेलेडी खाओ, खुद जान जाओ!''

देशात प्रश्न अनेक आहेत, चर्चा अनेक आहेत, वाद अनेक आहेत. पण आजच्या काळात एक गोष्ट मात्र स्पष्ट झाली आहे, आपल्या देशात कधी काय राष्ट्रीय मुद्दा बनेल हे सांगणं कठीण आहे.

म्हणून हसा, आनंदी राहा आणि बाकीचं... ''मेलेडी खाओ, खुद जान जाओ!''

# राजकारण मुद्यांकडून व्यक्तिकेंद्रित संघर्षाकडे

**देशाचे राजकारण नेमके कोणत्या दिशेने चालले आहे?, हा प्रश्न आज सामान्य नागरिकांच्या मनात अधिक तीव्रतेने उभा राहत आहे. एका बाजूला जागतिक स्तरावर युद्ध सदृश परिस्थिती, आर्थिक अस्थिरता, महागाई आणि बेरोजगारी यांसारखी गंभीर आव्हाने उभी आहेत, तर दुसऱ्या बाजूला देशांतर्गत राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू जनतेच्या प्रश्नांवरून व्यक्तींवरील आरोप-प्रत्यारोपांकडे सरकत असल्याचे चित्र दिसत आहे.त्यामुळे लोकशाहीचा मूलभूत उद्देश ''जनहित आणि विकास'' हा मागे पडत चालल्याची भावना वाढीस लागली आहे.जागतिक घडामोडींचा परिणाम भारतासारख्या मोठ्या अर्थव्यवस्थेवर होणे स्वाभाविक आहे. आंतरराष्ट्रीय संघर्षांमुळे तेलाच्या किमती वाढतात, पुरवठा साखळी विस्कळीत होते आणि महागाईचा दबाव वाढतो. अशा परिस्थितीत सरकारकडून तातडीची उपाययोजना, स्पष्ट भूमिका आणि जनतेला विश्वास देणारे निर्णय अपेक्षित असतात. मात्र अनेकदा अशा संकटाच्या पार्श्वभूमीवरही राजकीय पक्ष निवडणूक प्रचार, सभा आणि सत्तासंघर्षात अधिक व्यस्त असल्याचे चित्र निर्माण होते. त्यामुळे ''देश प्रथम की,निवडणूक प्रथम?'' हा प्रश्न जनतेच्या मनात उभा राहणे स्वाभाविक आहे. लोकशाहीमध्ये निवडणुका महत्त्वाच्या असतात, कारण त्याद्वारेच जनतेचा कौल मिळतो. पण देश गंभीर आर्थिक किंवा सामाजिक संकटातून जात असताना सत्ताधाऱ्यांची प्राथमिकता काय असावी, यावरही चर्चा व्हायला हवी. विरोधकांकडून सरकारवर टीका केली जाते आणि सत्ताधाऱ्यांकडून विरोधकांवर प्रतिआरोप केले जातात. हे लोकशाहीचे लक्षण असले तरी त्याची मर्यादा असते. दुर्दैवाने, गेल्या काही वर्षांत ही मर्यादा अनेकदा ओलांडली गेल्याचे दिसते.राजकीय भाषेतील घसरलेला स्तर हा सध्या चिंतेचा विषय ठरत आहे. एका काळी धोरणांवर आणि विचारसरणींवर होणाऱ्या चर्चा आता व्यक्तींच्या नावाने टोमणे मारणे, अपमानास्पद उल्लेख करणे आणि सोशल मीडियावर ट्रोल संस्कृती निर्माण करणे यामध्ये बदलल्या आहेत. ''पप्पू'', ''चौकीदार चोर'', ''गद्दार'' यांसारख्या शब्दप्रयोगांनी राजकीय वातावरण अधिक विषारी बनले आहे. अशा भाषेचा परिणाम केवळ नेत्यांवर होत नाही, तर समाजातील संवाद संस्कृतीवरही होतो. लोकशाहीत मतभेद आवश्यक असतात; मात्र वैचारिक संघर्ष वैयक्तिक द्वेषात बदलू लागला तर समाजातील सभ्यता धोक्यात येते. अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी काही संदर्भात पत्रकारिता, आरटीआय आणि बेरोजगार तरुणांविषयी बोलताना ''कॉकरोचसारखी वाढ'' असा उल्लेख केल्याचे व्यापक चर्चेत आले. या वक्तव्याचे सोशल मीडियावर तीव्र पडसाद उमटले. मराठवाड्यातील हिंगोली येथील एका तरुणाने या विधानाला प्रतीकात्मक उत्तर देत ''कॉकरोच जनता पार्टी'' नावाने एक सामाजिक माध्यमावरील अभियान सुरू केले. आश्चर्य म्हणजे अत्यंत कमी कालावधीत हजारो-लाखो लोक त्याच्याशी जोडले गेले. ही घटना केवळ विनोद, उपहास किंवा सोशल मीडिया ट्रेंड म्हणून पाहून चालणार नाही. त्यामागे व्यवस्थेविषयीचा असंतोष, बेरोजगारीची वेदना आणि दुर्लक्षित असल्याची भावना स्पष्टपणे दिसून येते. तरुण पिढीची ही प्रतिक्रिया व्यवस्थेने गांभीर्याने घेण्याची गरज आहे. बेरोजगारी, वाढती स्पर्धा आणि भविष्याबद्दलची अनिश्चितता यामुळे तरुणांमध्ये नाराजी वाढत आहे. सोशल मीडियावरील विविध व्यासपीठे ही आता केवळ मनोरंजनाची साधने राहिलेली नाहीत; ती असंतोष व्यक्त करण्याची माध्यमे बनली आहेत.राजकारणाचे अंतिम उद्दिष्ट जनतेचे प्रश्न सोडवणे हेच असते. महागाई, रोजगार, शिक्षण, शेती, आरोग्य यांसारखे मूलभूत विषय चर्चेच्या केंद्रस्थानी असणे गरजेचे आहे. मात्र सध्याचे चित्र पाहता मुद्दे मागे पडत आहेत आणि व्यक्तिकेंद्रित संघर्ष पुढे येत आहे. यामुळे जनतेचा राजकारणावरील विश्वास कमी होण्याचा धोका निर्माण झाला आहे.लोकशाही केवळ निवडणुकांवर टिकत नाही; ती जनतेच्या विश्वासावर टिकते. राजकीय पक्षांनी आरोप-प्रत्यारोपांच्या पलीकडे जाऊन संवादाची भाषा बदलली, तरच देशाचे राजकारण पुन्हा विकास, विचार आणि जनहिताच्या मार्गावर येऊ शकेल. अन्यथा राजकारणातील वाढता गोंधळ आणि समाजातील वाढती अस्वस्थता ही भविष्यासाठी चिंतेची बाब ठरू शकते.**

# ''भोगवाद, नैतिकतेचा ऱ्हास आणि बदलत्या समाजाचे चिंतन''



आजचा समाज अनेक विरोधाभासांनी भरलेला आहे. एका बाजूला विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण आणि आर्थिक प्रगतीची चर्चा होत असताना दुसऱ्या बाजूला नैतिक मूल्यांचा ऱ्हास, वाढती गुन्हेगारी, दिखाऊपणा, सामाजिक असंतुलन आणि मानसिक अस्वस्थता यांची चिंताजनक परिस्थिती निर्माण होत आहे. समाजात घडणाऱ्या अनेक घटना पाहिल्यानंतर एक सामान्य नागरिक म्हणून मनात वेदना निर्माण होणे स्वाभाविक आहे. या वेदनेतूनच अनेक प्रश्न उपस्थित होतात. समाज कोणत्या दिशेने चालला आहे? तरुण पिढीचे भविष्य काय आहे? वाढत्या भोगवादी संस्कृतीचा शेवट कुठे होणार? आणि या सर्वांमध्ये माणुसकी, संयम, संस्कार आणि सामाजिक जबाबदारी यांचे स्थान कुठे राहिले आहे?

आज आपण अशा काळात जगत आहोत जिथे साधेपणा हा कमीपणाचे लक्षण मानला जातो आणि दिखाऊपणा हा प्रतिष्ठेचा भाग बनला आहे. आर्थिक परिस्थिती कितीही बिकट असली तरी अनेक लोक लक्झरी जीवनशैलीकडे आकर्षित होत आहेत. महागडे कपडे, महागड्या गाड्या, ब्रँडेड वस्तू, सोशल मीडियावरील दिखाऊ जीवन आणि सतत इतरांपेक्षा वरचढ दिसण्याची स्पर्धा यामुळे समाजात कृत्रिमता वाढत आहे. अनेक कुटुंबे कर्ज काढून दिखाऊ खर्च करतात. लग्नसमारंभ, वाढदिवस, पार्ट्या आणि इतर कार्यक्रमांमध्ये अनावश्यक खर्च करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. यामुळे आर्थिक ताण निर्माण होतो आणि मानसिक अस्वस्थता वाढते.खरे तर मर्यादा हीच माणसाची खरी ओळख आहे. साधेपणातही सौंदर्य असते आणि संयमातही प्रतिष्ठा असते. पूर्वी समाजात माणसाचा आदर त्याच्या चारित्र्यामुळे, कष्टामुळे आणि सामाजिक योगदानामुळे केला जात होता. आज मात्र बाह्य रूप, पैसा आणि प्रसिद्धी यांनाच महत्त्व दिले जात आहे. ही मानसिकता बदलणे आवश्यक आहे. समाजात पुन्हा नैतिक मूल्ये रुजवली गेली पाहिजेत. मुलांना लहानपणापासूनच संयम, जबाबदारी, परस्पर आदर आणि योग्य वर्तनाचे शिक्षण दिले पाहिजे.

आज अनेक गुन्हे, विशेषतः महिलांवरील अत्याचार, लैंगिक गुन्हे आणि सामाजिक विकृती याबाबत समाजात तीव्र चर्चा होत असते. मात्र या विषयांवर चर्चा करताना संतुलित दृष्टिकोन आवश्यक आहे. कोणत्याही गुन्ह्याचे समर्थन होऊ शकत नाही आणि कोणत्याही प्रकारच्या जबरदस्तीला किंवा अत्याचाराला माफी असू शकत नाही. स्त्री असो वा पुरुष, प्रत्येक व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा आणि सन्मानाचा आदर केला गेला पाहिजे. समाजात वाढत्या विकृत मानसिकतेमागे केवळ एकच कारण नसते; त्यामागे अनेक सामाजिक, आर्थिक, मानसिक आणि सांस्कृतिक घटक असतात. यामध्ये शिक्षण व्यवस्थेची भूमिकाही महत्त्वाची आहे. आज शिक्षण केवळ नोकरी मिळवण्याचे साधन बनले आहे. चारित्र्य, नैतिकता, सामाजिक जबाबदारी आणि जीवनमूल्यांचे शिक्षण मागे पडले आहे. प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयामध्ये मुला-मुलींना परस्पर आदर, सुरक्षितता, जबाबदारी, कायद्याचे भान आणि मानसिक आरोग्य याबाबत मार्गदर्शन करणारी शिबिरे आयोजित केली गेली पाहिजेत. तरुणांना केवळ परीक्षेतील गुण नव्हे तर जीवन कसे जगावे हे शिकवणे अधिक महत्त्वाचे आहे.

आज सोशल मीडिया, चित्रपट, वेब सिरीज आणि जाहिरातींचा तरुणांच्या मानसिकतेवर मोठा प्रभाव पडत आहे. अनेकदा अश्लीलता, हिंसा, व्यसन, भोगवाद आणि बेजबाबदार जीवनशैली यांचे आकर्षक चित्रण केले जाते. याचा परिणाम लहान मुलांवर आणि किशोरवयीन मुलांवर गंभीरपणे होत आहे. सतत चुकीच्या प्रकारचे दृश्य आणि सामग्री पाहिल्यामुळे संवेदनशीलता कमी होत जाते. त्यामुळे माध्यमांनीही सामाजिक जबाबदारी ओळखणे गरजेचे आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य महत्त्वाचे असले तरी त्यालाही काही नैतिक मर्यादा असणे आवश्यक आहे. आज फॅशनच्या नावाखाली अनेकदा अतिरेकी दिखाऊपणा केला जातो. वस्त्र परिधान करणे हा प्रत्येकाचा वैयक्तिक अधिकार आहे, मात्र समाजातील वातावरण, सुरक्षितता आणि सभ्यता यांचाही विचार होणे आवश्यक आहे. येथे दोषारोप किंवा बंधने घालण्यापेक्षा सामाजिक जाणीव वाढवणे अधिक गरजेचे आहे. पुरुषांनीही महिलांकडे सन्मानाने पाहण्याची मानसिकता विकसित केली पाहिजे. स्त्रीच्या कपड्यांमुळे गुन्हे होतात असे म्हणणे चुकीचे आहे; गुन्हे हे विकृत मानसिकतेमुळे होतात. त्यामुळे समाजात स्त्री-पुरुष समानतेचे आणि परस्पर आदराचे संस्कार रुजवणे अधिक महत्त्वाचे आहे. समाजातील काही ठिकाणी सुरू असलेल्या बेकायदेशीर व्यवसायांवरही कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. मानवी तस्करी, जबरदस्ती, महिलांचे शोषण आणि गरिबीमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा सखोल अभ्यास झाला पाहिजे. अनेक महिला परिस्थितीमुळे अशा दलदलीत अडकतात. काहींना फसवले जाते, विकले जाते किंवा दबावाखाली ठेवले जाते. त्यामुळे केवळ दोष देण्यापेक्षा पुनर्वसन, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. आजच्या आर्थिक परिस्थितीकडे पाहिले तर सामान्य माणसाचे जीवन अधिक कठीण होत चालले आहे. महागाई सातत्याने वाढत आहे. अन्नधान्य, पेट्रोल-डिझेल, शिक्षण, आरोग्य सेवा आणि दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या किमती सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर जात आहेत. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी पाण्याची तीव्र टंचाई आहे. काही गावांमध्ये महिलांना आणि मुलांना चार-चार किलोमीटर पायी जाऊन पाणी आणावे लागते. उन्हाळ्यात परिस्थिती अधिक गंभीर होते. या प्रश्नांवर तातडीने आणि दीर्घकालीन उपाययोजना होणे आवश्यक आहे. पाण्याचे व्यवस्थापन, जलसंधारण, वृक्षारोपण आणि ग्रामीण विकास या विषयांकडे गंभीरपणे लक्ष दिले गेले पाहिजे. शहरांमध्ये पाण्याचा अपव्यय होतो, तर ग्रामीण भागातील लोक एका बादली पाण्यासाठी संघर्ष करतात. ही विषमता कमी करण्यासाठी शासन, प्रशासन आणि समाज यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे इंधनाचा वापर प्रचंड वाढला आहे. प्रत्येक घरात एक नव्हे तर दोन-तीन वाहने दिसतात. सार्वजनिक वाहतुकीपेक्षा खासगी वाहनांना प्राधान्य दिले जाते. परिणामी प्रदूषण वाढते, वाहतूक कोंडी निर्माण होते आणि पेट्रोल-डिझेलवरील खर्चही वाढतो. शक्य तिथे सायकलचा वापर, सार्वजनिक वाहतूक आणि इंधन बचतीच्या सवयी अंगीकारल्या पाहिजेत. पर्यावरण संरक्षण ही आता निवड नसून गरज बनली आहे. राजकारणातही अनावश्यक दिखाऊपणा वाढताना दिसतो. काही नेत्यांच्या ताफ्यात दहा-दहा, वीस-वीस गाड्या असतात. मोठा सुरक्षा ताफा, अनावश्यक खर्च आणि शासकीय यंत्रणेचा वापर यामुळे जनतेमध्ये नाराजी निर्माण होते. लोकप्रतिनिधी हे समाजाचे सेवक आहेत ही भावना प्रत्यक्ष कृतीतून दिसली पाहिजे. साधेपणा आणि पारदर्शकता हीच खरी लोकसेवा आहे. भेसळयुक्त अन्नपदार्थ, नकली वस्तू आणि ग्राहकांची फसवणूक हेही गंभीर प्रश्न बनले आहेत. पैसा कमावण्याच्या हव्यासापोटी काही लोक जनतेच्या आरोग्याशी खेळत आहेत. दूध, तेल, मसाले, मिठाई आणि औषधांमध्येही भेसळ आढळते. प्रशासनाने कठोर कारवाई केली पाहिजे, तसेच ग्राहकांनीही जागरूक राहिले पाहिजे.



दत्तोपंत डहाळे
नांदेड.

आज समाजात जातीय आणि धार्मिक तणाव निर्माण करण्याचे प्रयत्नही काही ठिकाणी होताना दिसतात. अशा वेळी सर्व समाजाने एकत्र येऊन सलोखा, बंधुभाव आणि शांततेचा संदेश दिला पाहिजे. भारताची ताकद विविधतेत आहे. अनेक धर्म, भाषा, संस्कृती आणि परंपरा असूनही आपण एक राष्ट्र म्हणून उभे आहोत. द्वेष, अफवा आणि हिंसा यामुळे कोणाचेही भले होत नाही. पालकांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. आज अनेक पालक मुलांना वेळ देऊ शकत नाहीत. मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडिया हीच मुलांची दुनिया बनत चालली आहे. मुलांच्या मानसिक विकासासाठी संवाद, संस्कार आणि कुटुंबातील प्रेम आवश्यक असते. मुलांना फक्त पैसे आणि सुविधा देणे पुरेसे नाही; त्यांना योग्य मार्गदर्शन देणे अधिक महत्त्वाचे आहे. तसेच तरुणांनीही स्वतःच्या जबाबदाऱ्या ओळखल्या पाहिजेत. जीवनात शिस्त, मेहनत, संयम आणि ध्येय आवश्यक आहे. चुकीच्या संगतीपासून दूर राहणे, व्यसनांपासून स्वतःला वाचवणे आणि स्वतःच्या भविष्याचा गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे. प्रत्येक कृतीचे परिणाम असतात याचे भान ठेवणे आवश्यक आहे. समाजातील वातावरण सतत बिघडत चालले आहे अशी भावना अनेकांच्या मनात आहे. मात्र केवळ टीका करून उपयोग नाही. प्रत्येकाने स्वतःपासून बदलाची सुरुवात केली पाहिजे. आपण वाहतुकीचे नियम पाळतो का? पाणी वाचवतो का? महिलांचा आदर करतो का? मुलांना योग्य संस्कार देतो का? सामाजिक सलोखा टिकवण्यासाठी प्रयत्न करतो का? या प्रश्नांची उत्तरे शोधणे आवश्यक आहे. माध्यमांनीही जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. एखादी घटना घडली की ती सतत दाखवून समाजात भीती, तणाव आणि नकारात्मकता वाढवली जाते. सनसनाटीपणापेक्षा सत्य आणि संवेदनशीलता अधिक महत्त्वाची आहे. लहान मुलांवर आणि तरुणांवर होणारा मानसिक परिणामही लक्षात घेतला पाहिजे. आज समाजाला स्पष्ट विचार मांडणाऱ्या, लोकांना योग्य दिशा देणाऱ्या आणि सकारात्मक बदलासाठी काम करणाऱ्या व्यक्तींची गरज आहे. केवळ राजकारण, वाद आणि आरोप-प्रत्यारोप यातून समाज पुढे जाणार नाही. शिक्षण, रोजगार, आरोग्य, पर्यावरण, नैतिकता आणि सामाजिक न्याय या विषयांवर गंभीरपणे काम झाले पाहिजे. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की समाज बदलण्यासाठी कायदे आणि शासन महत्त्वाचे असले तरी माणसाची मानसिकता बदलणे अधिक आवश्यक आहे. संयम, मर्यादा, परस्पर आदर, कष्ट, साधेपणा आणि माणुसकी या मूल्यांवर समाज पुन्हा उभा राहिला तर अनेक समस्या आपोआप कमी होतील. प्रत्येकाने स्वतःच्या कुटुंबापासून, परिसरापासून आणि दैनंदिन जीवनापासून सुरुवात केली तर समाजात सकारात्मक बदल घडू शकतो. ही केवळ एका ज्येष्ठ नागरिकाची तळमळ नाही, तर आज अनेक सामान्य लोकांच्या मनातील वेदना आहे. समाजात शांतता, सुरक्षितता, समानता आणि नैतिक मूल्ये टिकून राहावीत हीच सर्वांची अपेक्षा आहे. चुका होत असतील तर त्या सुधारण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. परस्पर दोषारोपांपेक्षा संवाद, समजूतदारपणा आणि सामाजिक जबाबदारी यांतूनच चांगला समाज निर्माण होऊ शकतो.

# माहूर पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक संपन्न!

माहूर/प्रतिनिधी- तालुक्यात आगामी सणउत्सवांच्या पार्श्वभूमीवर माहूर शहरात व तालुक्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी माहूर पोलीस ठाण्यात बकरी ईद निमित्त (ईद-उल-जुहा) शांतता समितीची बैठक गुरुवार दि. २१ रोजी पार पडली. बैठकीत बकरी ईद सण शांततापूर्ण, सौहार्दपूर्ण आणि नियमांचे पालन करून पार पडावा यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सणउत्सव शांततेत व कोणताही अनुचित प्रकार घडू न देता पार पाडण्यावर भर देण्यात आला. तसेच सोशल मीडियावर अफवा पसरवणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा माहूरचे पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी दिला.



बैठकीत गोवंश हत्या प्रतिबंधक कायद्याबाबतही माहिती देण्यात आली. उघड्यावर कत्तल किंवा मांस विक्री न करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच नागरिकांनी शांतता व सामाजिक सलोखा कायम ठेवून प्रशासनास सहकार्य करावे आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी सांगितले की, ईद हा केवळ बलिदानाचा सण नसून माणुसकी, प्रेम आणि कायद्याप्रती आदराचा संदेश देणारा सण आहे. देशात गोहत्या कायद्याने प्रतिबंधित असेल, तर त्या कायद्याचे पालन करणे हे प्रत्येक जबाबदार नागरिकाचे कर्तव्य आहे. इस्लाम आपल्याला आपण राहत असलेल्या देशाच्या कायद्याचा व शांततेचा आदर करायला शिकवतो. एक मुस्लिम आपल्या श्रद्धेसोबतच मातृभूमीची शांतता आणि बंधुत्वाचेही रक्षण करतो. कायद्याचा आदर करणे आणि उपद्रव व द्वेष टाळणे हीच खरी माणुसकी असून ती श्रद्धेचाच एक भाग आहे. ईद हा द्वेष पसरवण्याचा नव्हे, तर प्रेम वाटण्याचा सण असल्याने माहूर शहरात परस्पर बंधुत्व, शांतता आणि माणुसकी सदैव नांदत राहील. असे मत त्यांनी व्यक्त केले. या वेळी जामा मस्जिदचे शेख नासिर शेख जलाल, नागीना मस्जिदचे ताहेर अली, मदिना मस्जिदचे गफूर सौदागर, फयाज भाई, नगरसेवक प्रतिनिधी अफसर अली, निसार कुरेशी, वशिम कुरेशी, आशु पठाण, गोपनीय शाखेचे जाधव यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# अधिक मासात जप, दान, पूजा केल्याने पुण्य अधिक पटीने वाढते-अविनाश स्वामी

देगलूर/प्रतिनिधी-येणाऱ्या १७ मे ते १५ जून २०२६ या कालावधीत अधिक मास असून हा महिना भगवान विष्णूंना अत्यंत प्रिय मानला जातो. या महिन्यात जप, दान, पूजा, व्रत, सेवा केल्याने त्यांची पुण्य अधिक पटीने वाढते, असे शास्त्रात नमूद करण्यात आले असून धार्मिक कार्य अखंडपणे करावे, असे मत लोणी ता. देगलूर येथील प्रसिद्ध वेदशास्त्र अभ्यासक अविनाश वैजनाथ स्वामी यांनी व्यक्त केले आहे.

दर तीन वर्षांनी येणारा अधिक मास शुभ का अशुभ याबाबतीत चर्चा होत असून अविनाश स्वामी यांनी शास्त्राच्या आधारे माहिती सांगितली. ते म्हणाले हा महिना विष्णू लक्ष्मी उपासना करता श्रेष्ठ आहे. विष्णू सहस्त्रनाम व्यंकटेश स्तोत्र रामरक्षा, श्रीमद्भागवत, वगैरे पाठ वाचन केल्याने खूप पुण्य फळ मिळते. कारण जर तीन वर्षांनी रिक्त क्षय तिथी भरून निघते. यालाच अधिक मास म्हणतात व या



महिन्यात महिनाभर एक भुक्त अथवा नक्त भोजन व देवासमोर अखंड दीप महिनाभर तांबूल दान व गंगा स्नान केल्याने पुण्य फळ मिळते. लक्ष्मी प्राप्ती होते. शक्य असेल तर अन्नदान, वस्त्रदान करावे. द्वादशी, पोर्णिमा, अष्टमी, नवमी, चतुर्दशी, अमावस्या, व्यतिपत, व महिन्यात श्रद्धेने अपुप म्हणजे अनारसे देवास, गाईस, गंगेला, गुरूंना, लेक जावई अतिथी गरजू लोकांना मदत दान केल्यास मोक्ष पुण्य प्राप्त होते जुने कामे चालू ठेवता येईल मात्र नवीन कामे, मोठ्या तीर्थयात्रा, लग्न, साक्षगंध, वास्तु, भूमिपूजन, वगैरे जमत नाहीत मात्र नित्यकर्म, पूजा, अर्चा, श्राद्ध, बाळास अन्नप्राशन, नामकरण, देवाची पुनर परिस्थावना, करता येईल दर तीन वर्षांनी येणार अधिक मास शुभ आहे. या महिन्यात जेवढे जमेल तेवढे जप नामस्मरण व सत्यनारायण पूजा करावी व कोणतीच शंका कुशंका न करता या महिन्यात पुण्य फळ प्राप्त करावे. फक्त नवीन कोणतेच काम सुरुवात करू नये, जुने सर्व कामे करता येतील असेही लोणी येथील अविनाश वैजनाथ स्वामी यांनी सांगितले.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर, भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन ?, कंधारमध्ये अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाले विकास कामांचे भूमिपूजन

कंधार/प्रतिनिधी-विधान परिषद निवडणूकीच्या अनुषंगाने नांदेड जिल्ह्यात निवडणुकांचे बिगुल वाजले असुन आदर्श आचार सहिंता जिल्ह्यात लागू झाली आहे, नेमके त्याच दिवशी सोमवार दि. १८ मे रोजी कंधार शहरात विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले. हे आचार संहितेचे उल्लंघन की कायद्याच्या चौकटीत झाले? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

विशेष म्हणजे या विविध ठिकाणी झालेल्या भूमिपूजन कार्यक्रमांना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची ही उपस्थिती होती त्यामुळे याची चर्चा होत आहे. कंधार शहरात केलेल्या विकास कामाच्या भूमिपूजनाला मात्र नगराध्यक्षांना विश्वासात घेतले नसल्याने उलट सुलट चर्चेला उध्दान आले आहे. शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला आ.चिखलीकर यांनी तहसील कार्यालयालयासमोर जागा दिली. निधी मात्र पूर्वी असलेल्या पुतळयाच्या सुशोभिकरणाच्या कामाला दिला असल्याने मातंग समाजाची ही आमदारांनी फसवूनक केल्याची समाज बांधवांमध्ये मोठ्या प्रमाणात चर्चा चालू आहे.

महाराष्ट्र विधानसभा परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघाचा नांदेडसह १७ जागांच्या निवडणुकीचा कार्यक्रम दि.१८ रोजी जाहीर करण्यात आला. निवडणुकीचे बिगुल वाजताच नांदेड जिल्ह्यासह सतरा ठिकाणी आचार संहिता लागू झाली आहे. आचारसंहिता लागू झाल्यानंतर कुठल्याही प्रकारे सरकारी घोषणा, नवीन योजना सुरू करता येत नाहीत. शीलान्यास, उद्घाटन, लोकार्पण, भूमिपूजन असे कार्यक्रमही घेता येत नाहीत असे नियम असताना कंधार मध्ये कांही विकास कामांचे भूमिपूजन पार पडले. सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत शहरातील मुख्य रस्त्यावर महाराणा प्रतापसिंह चौका ते छत्रपती शिवाजी महाराज चौका पर्यंत स्टेट लाईट बसवणे व कंधार - मुखेड फाटा पर्यंतच्या रस्त्याची दुरुस्ती करणे या कामांचे तर नगर पालिका अंतर्गत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारकाचे सुशोभीकरण करणे कामाचे तसेच तालुक्यातील तेलूर येथे मृद व जलसंधारण विभागा अंतर्गत कोल्हापुरी बांधाऱ्याचे दुरुस्ती करणे या कामांचे पाटी लावून भूमिपूजन करण्यात आले हि सर्व कार्यक्रमे पूर्व नियोजित होती. मात्र निवडणुक कार्यक्रम जाहीर झाल्या नंतर करण्यात आली. शहरात व तेलूर येथे झालेल्या कार्यक्रमास संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. आचार संहिता अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असलेले अधिकारी या कार्यक्रकांना हजर राहिल्याने नागरिकांतून याची चर्चा होत असुन हे कार्यक्रम आचार संहितेच्या चौकटीत मोडत नाहीत का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा दर्शनी भागात यावा यासाठी मातंग समाज बांधव गेली अनेक वर्षांपासून आंदोलन मोर्चा काढत आहे. महाराणा प्रताप चौक ते जाधव हॉस्पिटल या रस्त्यावर असलेले नगरपालिकेचे शॉपिंग सेंटर पाडून अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा दर्शनी भागात आणा यासाठी अनेक आंदोलने झाली. यावर आ.चिखलीकर यांनी तोडगा काढून तहसील कार्यालयासमोरील नगर-पालिकेच्या ताब्यात असलेली जागा अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यासाठी रितसर देऊन हे आंदोलन कायमस्वरूपी मिटवले होते. असे असतानाही आमदार महोदयांनी दिलेल्या जागेवर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाचे काम करण्यासाठी निधी न देता पूर्वी ज्या ठिकाणी पुतळा आहे त्याच ठिकाणी वीस लाख रुपयांचा निधी सुशोभिकरण करण्यासाठी दिला आहे. जर नवीन दिलेल्या जागेत पुतळा बसवायचाच नव्हता तर ही जागा कशासाठी दिली असा संतप्त सवाल आता समाज बांधव करत आहे.

कंधार शहरात विविध विकास कामाच्या भूमिपूजनाच्या कामाचे नियोजन नगरपालिकेच्या वतीने करण्यात आले होते. परंतु हे नियोजन करत असताना नगराध्यक्षांना अद्यापही विश्वासात न घेता त्यांना या कामाची कसल्या प्रकारची माहिती दिली नाही. विशेष बाब म्हणजे नगरपालिकेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची सहमती नगराध्यक्ष यांच्याकडून घेतल्या जाते परंतु या कार्यक्रमाला नगराध्यक्षांनाच निमंत्रण दिले नसल्याने मुख्याधिकारी वादाच्या भोवऱ्यात सापडले? या सर्व बाबींवर नगराध्यक्ष शहाजी नळगे हे कायदेशीर कोणती भूमिका घेणार याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.




माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त नवामोंढा येथील कॉंग्रेस कमिटी कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कॉंग्रेसचे नूतन जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, प्रदेश सरचिटणीस ॲड.सुरेंद्र घोडजकर, महानगराध्यक्ष अब्दुल गफार, केदार पाटील साळुंके, रमेश चित्ते व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# अमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या महिलेसह चार जणांना अटक


## स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाची कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-पंजाब राज्यातून अमली पदार्थाची तस्करी होत असल्याचे माहिती मिळाल्यानंतर एलसीबीच्या पथकाने कोर्ट ते हिंगोली गेट या मार्गावर मागील बाजूस सापळा रचून एका महिलेसह अन्य एका साथीदाराला ताब्यात घेतले. त्यानंतर चौकशी दरम्यान अन्य दोघांची नावे समोर आल्याने त्या दोन आरोपींना देखील पोलिसांनी बेड्या ठोकल्या असून आरोपी विरुद्ध वजीराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

एक महिला पंजाब राज्यातून ब्राऊन शुगर (चिट्टा) या अमली पदार्थाची विक्री करण्यासाठी आली असल्याची माहिती एलसीबीच्या पथकाला मिळाली. सदर महिला आपल्या साथीदारासह हिंगोली गेट ते कोर्ट या मार्गावर विक्रीसाठी येणार असल्याचे समजताच पोलिसांनी त्या भागात सापळा रचला. या छापेमारीत राजविंदरकौर जर्मनजीतसिंग महाल (वय ३८, रा.दुरिया, जि.अमृतसर) व गुरुमुखसिंग उर्फ गुरु सेवकसिंग गिल (२८, शाहीदपुरा) या दोघांना ताब्यात घेवून त्यांची अंगझडती घेतली त्यांच्याकडे ७२ ग्रॅम वजनाचे अमलीपदार्थ ब्राऊन शुगर आढळून आले. पोलिसांनी नगदी रुपये स्कुटी आणि ब्राऊन शुगर असा एकूण चार लाख ७० हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. या गुन्ह्यात अमनाप्रीतसिंग उर्फ मणी जगजीतसिंग बेदी (रा.गेट नंबर दोन), व जनार्दन उर्फ पटेल गोविंदराव सोनटक्के (ब्राह्मणवाडा) या दोघांचा सहभाग असल्याची माहिती पोलीस तपासात समोर आली. पोलिसांनी या दोघांना ताब्यात घेतले. या प्रकरणी चार आरोपी विरुध्द वजीराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

# डॉ.सुरेश सावंत यांना ग.ह.पाटील पुरस्कार

नांदेड/प्रतिनिधी-ज्येष्ठ बालसाहित्यकार तथा शिक्षणतज्ज्ञ डॉ. सुरेश सावंत यांना पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेचा डॉ. मंदा खांडगे पुरस्कृत ग. ह. पाटील पुरस्कार जाहीर झाला आहे. ज्येष्ठ कवी तथा शिक्षणतज्ज्ञ ग. ह. पाटील यांच्या स्मरणार्थ दरवर्षी एका ज्येष्ठ साहित्यिकाला बाल साहित्यातील अनमोल योगदानासाठी हा पुरस्कार देण्यात येतो. येत्या २६ मे रोजी पुण्यात बालगंधर्व रंगमंदिरात



आयोजित एका विशेष समारंभात डॉ. सावंत यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

डॉ. सावंत यांची आजवर ६० पुस्तके प्रकाशित झाली असून त्यापैकी ३५ पुस्तके बालसाहित्याची आहेत. त्यांना साहित्य अकादमीच्या पुरस्कारासह महाराष्ट्र शासनाचे तीन पुरस्कार आणि अन्य प्रतिष्ठित साहित्यसंस्थांचे ४५ पुरस्कार मिळाले आहेत. शिक्षणक्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना राष्ट्रपती पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. नांदेड जिल्हा परिषदेचा नरहर कुरुंदकर पुरस्कार आणि दै. सत्यप्रभाचा सौ. कुसुमताई शंकरराव चव्हाण जीवनगौरव पुरस्कार त्यांना मिळाला आहे. पुणे येथील अ. भा. मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या जीवनगौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

# बँकेत नौकरी लावतो म्हणून साडेपाच लाखाला गंडविले

नांदेड/प्रतिनिधी-आयसीआय बँकेत नौकरी लावतो म्हणून एका इसमाकडून साडेपाच लाख रुपये घेवून त्याची फसवणूक करणाऱ्या दोन जणाविरुध्द शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील नवामोंढा भागात १ एप्रिल ते १९ मे २०२६ या काळात कृष्णा नागनाथ गोपीवार (वय ४१) रा.विष्णुनगर, नांदेड यास आयसीआय बँकेत नौकरीचे आमिष एम.ए.सिद्दीकी रा.नागपूर व सुभाष बाबुराव नरवाडे रा.गोविंदनगर,नांदेड यांनी दाखविले. गोपिवार याच्याकडे दोघांनी पैशाची मागणी केली. नौकरीच्या आशेपोटी कृष्णा गोपीवार यांनी एम.ए.सिद्दीकी व सुभाष नरवाडे या दोघांना साडेपाच लाख रुपये रोख रक्कम दिली. पैसे दिल्यानंतरही काही दिवसांनी गोपीवार यांनी दोघांकडे नौकरी संदर्भात चौकशी केली असता त्यांनी वेळोवेळी उडवाउडवीची उत्तरे दिली. आपली आर्थिक फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर कृष्णा गोपीवार यांनी या संदर्भात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या प्रकरणी एम.ए.सिद्दीकी व सुभाष नरवाडे याच्या विरुध्द विविध कलमान्वये शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बोव्हाईन ब्रिडींग ॲक्टची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश

नांदेड/प्रतिनिधी-राज्यातील गाई-म्हशींच्या जातींमध्ये सुधारणा करण्यासाठी व प्रजनन प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३ लागू केला आहे. मात्र, अद्यापही क्षेत्रीय स्तरावरील खाजगी कृत्रिम रेतन सेवादाता व संस्थांनी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणी केली नसल्याची बाब समोर आली असल्याने संबंधितांवर या अधिनियमांतर्गत नियमोचित कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील यांनी अधिनस्त अधिकारी वर्गाला दिले आहेत.

राज्यामध्ये या कायद्याची अंमलबजावणी ५ डिसेंबर २०२४ पासून सुरू झाली आहे. उत्तम दर्जाच्या वळूंचा वापर करून कृत्रिम रेतनाद्वारे दुधाळ जनावरांची पैदास वाढवणे आणि प्रजननाशी संबंधित गैरप्रकारांना आळा घालणे, हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. या कायद्यांतर्गत राज्यातील सर्व रेत केंद्र), भ्रूण प्रत्यारोपण केंद्रे, कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था आणि सेवा पुरवठादारांना प्राधिकरणाकडे नोंदणी करणे बंधनकारक असून, त्यांना केवळ प्रमाणित व उच्च वंशावळीच्या वळूंचेच रेत प्रजननासाठी वापरता येईल. या सर्व प्रक्रियांवर देखरेख ठेवण्यासाठी 'महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाची' स्थापना करण्यात आली आहे. प्राधिकरणाला केंद्रांची तपासणी, झडती व नियमबाह्य साहित्य जप्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. कायद्यातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई व दंडाची तरतूद करण्यात आली असल्याने संभाव्य कारवाई टाळण्यासाठी संबंधितांनी प्राधिकरणाकडे लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन आयुक्त पशुसंवर्धन यांनी केले आहे.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ६ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष श्री नागेश वि.पवार)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६५३/२०२६
बसिरा बी व इतर वि.निरंक

अर्जदार : १. बसिरा बी भ्र.मोहम्मद हाशम वय : ५७ वर्षे धंदा : घरकाम, २. मुस्तफा हामद मोहम्मद पि.मोहम्मद हाशम वय ४६ वर्षे धंदा व्यापार, ३. मोहम्मद मुखीत फारूकी पि.मोहम्मद हाशम फारूकी, वय ४४ वर्षे धंदा व्यापार, ४. मोहम्मद इरशाद फारूकी पि.मोहम्मद हाशम फारूकी (मयत) तर्फे वारस, ४.१ समीरा खानम भ्र.मोहम्मद इरशाद फारूकी, वय ३८ वर्षे धंदा घरकाम, ४.२ मोहम्मद उमेर फारूकी पि.मोहम्मद इरशाद फारूकी, अ.पा.क. आई, ४.३ मोहम्मद उमर फारूकी पि.मोहम्मद इरशाद फारूकी, अ.पा.क. आई, ५. नौशाद फारूकी पि.हाशम फारूकी, वय ३७ वर्षे धंदा व्यापार, ६. शहनाझ तरन्नुम भ्र. सयद असिफ, वय ३१ वर्षे धंदा घरकाम, ७. शहाना बेगम पि. मोहम्मद हाशम वय ३० वर्षे धंदा घरकाम, ८. मोहम्मद नदीम पि. मोहम्मद हाशम वय २८ वर्षे धंदा व्यापार, सर्व रा. देगलूर नाका, इकबाल नगर, नांदेड.

विरूद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा मर्ज

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत मोहम्मद हाशम पि. ऐनौद्दीन फारूकी यांचे वारस आहेत. मयत मोहम्मद हाशम पि. ऐनौद्दीन फारूकी यांचा दिनांक १२/०७/१९९५ रोजी मृत्यु झाला आहे. अर्जदारांनी अर्जामध्ये नमूद केले आहे की, अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी, अर्जदार क्र.२, ३, ५ व ८ ही मयताची मुले व अर्जदार क्र. ६ व ७ या मयताच्या मुली व अर्जदार क्र. ४ हा मयताचा मयत मुलगा आहे.

वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी, प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणांस काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वत: हजर राहून या न्यायालयात दिनांक २५/०६/२०२६ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २०.०५.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | ''आदेशावरून'' |
| कनिष्ठ लिपिक, | स्वाक्षरित/- |
| ६ वे सह दिवाणी न्यायालय | सहा.अधिक्षक, |
| क.स्तर, नांदेड. | दिवाणी न्यायालय व.स्तर, नांदेड |

## जाहीर प्रगटन

अर्धापुर येथील दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, अर्धापूर
यांच्या न्यायालयात
समक्ष आर.बि.सोरकर दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, अर्धापुर
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७८/२०२६
मलेकाबी वि.निरंक

अर्जदार :- १. मलेकाबी भ्र.दस्तुमीया शेख, वयः ५५ वर्षे, धंदा : घरकाम, २. शेख तुफीख शेख दस्तुमीया, वयः ३४ वर्षे, धंदा : व्यवसाय दोघे रा.नई अबादी, अर्धापूर ता.अर्धापूर जि.नांदेड, ३. फरहाना बेगम भ्र. आरेफखा पठान, वयः ३४ वर्षे, धंदा : घरकाम रा.रूद्रवाडी ता.व जि.हिंगोली, ४. शकीलाबी भ्र.दस्तुमीया शेख, वयः ५१ वर्षे, धंदाः घरकाम ५. शेख परवेज पटेल दस्तु पटेल, वयः ३० वर्षे, धंदाः व्यवसाय रा. जवाहर कॉलनी, ता. बसमत जि. हिंगोली

वि.

गैरअर्जदार : निरंक

दावा :- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७, कलम २ व ३ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत शेख दस्तुमीया अस्मतुल्ला यांचा अर्जदार क्र.१ ही पत्नी, अर्जदार क्र. २ व ५ ही मुले, अर्जदार क्र.३ ही मुलगी, अर्जदार क्र.४ ही दुसरी पत्नी आहे. मयत शेख दस्तुमीया अस्मतुल्ला यांचा मृत्यू दिनांक ०२.०४.२०२६ रोजी झाला रा. गणपुर ता. अर्धापूर जि. नांदेड.

अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात दिनांक १५/०६/२०२६ रोजी किंवा तत्पूर्वी नोंदवावा, मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ०९/०५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | आदेशावरून |
| कनिष्ठ लिपिक, | स्वाक्षरित/- |
| दिवाणी न्यायालय, | स.अधिक्षक |
| क.स्तर, अर्धापुर | दिवाणी न्यायालय क.स्तर, अर्धापुर |

# अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त

किनवट/प्रतिनिधी-अवैध रेतीची वाहतूक करणारा एक ट्रॅक्टर महसूल विभागाच्या पथकाने मुद्देमालासह पकडून दुपारी तहसीलदारांच्या उपस्थितीत तहसील कार्यालयाच्या प्रांगणात लावला आहे. रेती चोरीला आवर घालायचा असेल तर बोधडी बु.चे मंडळाधिकारी जयराम गाडे यांच्या पथकाने ही कारवाई केली. ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकाऱ्यांनी सज्जावर राहणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.



सहाय्यक जिल्हाधिकारी किनवट जेनीतचंद्र दोंन्तुला आणि तहसीलदार डॉ.शारदा चौंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली २० मे रोजी रोजी सकाळी १०.३० वाजता बोधडी खू. येथे विना परवाना रेती वाहतुक करीत असलेले ट्रॅक्टर रेतीसह पकडून तहसिल कार्यालयात लावण्यात आले. मंडळ अधिकारी बोधडी बू.जयराम गाडे, मंडळ, ग्राम महसूल अधिकारी निकिता फोले, ग्राम महसूल अधिकारी हरीश यादव, ग्राम महसूल अधिकारी अनुसया ईप्पलवाड, ग्राम महसूल अधिकारी संदीप मडावी यांचा महसूल पथकात समावेश होता.

# एचएसआरपी नंबर प्लेट वेळेत बसवा आणि दंड टाळा

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यात १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या ज्या वाहनांना हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट नाही अशा सर्व वाहनचालकांनी अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरून ३० जून २०२६ पर्यंत एचएसआरपी नंबर प्लेट बसवून घ्यावी, असे आवाहन आवाहन सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत कॅंक्रेज यांनी केले आहे.

एचएसआरपी नंबर प्लेट नसलेल्या वाहनाचे काम जसे वाहन हस्तांतरण, वाहनाची पुन: नोंदणी, वाहनाचे वित्तदात्यांची नोंदणी, वाहनाची वित्तदात्याचा बोजा उतरवणे इत्यादी वाहना संबंधी कामकाज होणार नाही. तसे न केल्यास मोटार वाहन कायद्यानुसार एचएसआरपी नंबर प्लेट विहित वेळेत न बसविण्यासाठी परिवहन विभागामार्फत दंड आकारणी करण्यात येईल. दंड टाळण्यासाठी विहित मुदतीत एचएसआरपी नंबर प्लेट बसवून घ्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# परवानाधारक मुरुमाची गाडी जप्त;तहसीलदारांविरोधात शेतकऱ्याची थेट महसूल मंत्र्यांकडे तक्रार

## चोरांच्या गाड्या रात्री सोडतात,माझीच गाडी पकडली!

किनवट/प्रतिनिधी- रॉयल्टीचा मुरुम वाहतूक करीत असताना १३ मे रोजीच्या रात्री महसूलच्या पथकाने राजगड गावाजवळ हायवा गाडी पकडून तहसील कार्यालयात लावलीय. निसपूर येथील माणिक गणपत मुंडे यांच्याच राजगड शिवारातील शेतातून अधिकृत परवाना प्राप्त खदान असून त्यातील मुरुम घराच्या भरावासाठी घेऊन जात असतांना वस्तुनिष्ठ पुरावे दाखवल्यानंतरही हायवागाडी सोडली नसल्यामुळे त्या शेतकऱ्याने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंकडे धाव घेतलीय. अवैध गौण खनिजाच्या पकडलेल्या गाड्या तहसील कार्यालयातून रात्री कशा पळविल्या जातात या पुराव्यासह तहसीलदारांची तक्रार करुन चौकशीची मागणी केली आहे.

गौण खनिजांच्या दरोड्याचे एकमेव ठिकाण किनवट तालुक्यातील काही ठिकाणं ठरलेली आहेत. गायरान जमिनी, आदिवासींच्या जमिनी, इनामी काही जमिनी अवैध धंदेवाल्यांनी लक्ष करण्याचे धाडस महसूल प्रशासनाच्या संगनमताने चालवले आहे. अवैध चालणाऱ्या गाड्या महसूल पथकाच्या रडारवर नसून माणिक गणपत मुंडे यांच्याच राजगड येथील शेतातील परवान्याचा मुरुम त्याच शेतकऱ्यांच्या घराच्या भरावासाठी घेऊन जात असतांना कर्तव्याची री ओढणाऱ्यांनी गाडी धरुन तहसील कार्यालयात लावलीय असे मुंडे यांचे म्हणणे आहे. मे.शारदा कन्स्ट्रक्शन कंपनीला खदानीच्या वापरासाठी माणिक मुंडे यांनी जमिन दिली आहे. त्यातून मुरुम घेऊन जात असतांना हा प्रकार घडल्याचे त्यांनी सांगितले. या कर्तव्यदक्षतेचा आव आणून गौण खनिजाच्या चोरट्यांना मदत करणाऱ्या तहसीलदारांची राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंकडे या शेतकऱ्याने तक्रार केली आहे. रात्रीच्या अंधारात गौण खनिजाच्या पकडलेल्या चोरीच्या गाड्या



कशा सोडल्या जातात त्या व्हिडिओ शूटिंगच्या छायाचित्रणासह सपुरावा सादर केल्याचे सांगितले. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी मांडवी पोलीसांनी लाल रेतीची वाहतूक करणारा ट्रक पकडला आणि पुढे तहसील प्रशासनाने पोलीस प्रशासनाची केलेल्या गळचेपीचा मुद्दाही सादर केलाय. परंतु मंत्र्यासंत्र्यांनी या तहसीलदारांवर कारवाई करण्याची आजपर्यंत हिंमत दाखवली नसल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

# पुलवामा हल्ल्याचा मास्टरमाइंड हमजा बुरहानची हत्या

नवी दिल्ली:पुलवामा हल्ल्याचा मास्टरमाइंड आणि दहशतवादी हमजा बुरहान याच्यावर पाकिस्तानमध्ये अज्ञात व्यक्तींनी गोळ्या झाडल्या आहेत. या हल्ल्यात हमजा बुरहान याचा मृत्यू झाला आहे. हमजा बुरहान हा २०१९ मध्ये झालेल्या पुलवामा दहशतवादी हल्ल्याच्या मुख्य सूत्रधारांपैकी एक होता.

मिळालेल्या माहितीनुसार, दहशतवादी हमजा बुरहान हा मुजफ्फराबाद येथील आपल्या कार्यालयात बसला होता. मुजफ्फराबाद हे पाकिस्तानव्याप्त काश्मीर येथे आहे. कार्यालयात असताना अचानक काही अज्ञात लोक तिथे आले आणि हमजा बुरहानवर गोळ्या झाडल्या. या हल्ल्यात हमजा बुरहान याचा जागीच मृत्यू झाला आहे.पुलवामा दहशतवादी हल्ल्याच्या मुख्य सूत्रधारांपैकी हमजा बुरहान एक होता. पाकिस्तानमध्ये तो स्वत:ला शिक्षक म्हणून सांगत असे. पुलवामा हल्ल्यानंतर हमजा बुरहान हा अनेक दहशतवादी कारवायांत सामील होता. पाकिस्तानातील अनेक दहशतवाद्यांना हमजा हा ट्रेनिंग देत असे. त्यासह सीमावर्ती भागात दहशतवाद्यांना घुसखोरीसाठीही हमजा मदत करत होता.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते विकास लवांडेंना अटक

पुणे : वारकरी संप्रदायाबद्दल वक्तव्य करणे राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) प्रवक्ते विकास लवांडे यांना भोवलं आहे. विकास लवांडे यांना पुण्यातील वाघोली पोलिसांनी अटक केली आहे. माझ्यावर जीवघेणा हल्ला करणारे गुंड संग्राम भंडारे व इतर सर्व आरोपी मोकाट आहेत. पण, एका खोट्या फिर्यादीवरून कसलाही पुरावा नसताना अटक करण्यात आली आहे, असा आरोप विकास लवांडेंनी केला आहे.

वारकरी संप्रदायात घुसखोर असल्याचे म्हणत विकास लवांडे यांनी काही जणांनी यादी जाहीर केली होती. यानंतर एकच वाद उफाळून आला होता. याप्रकरणी वाघोली पोलीस ठाण्यात लवांडेंविरोधात दाखल केलेल्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल नोंदवण्यात आला होता. पण, लवांडेंना अतिरिक्त सत्र न्यायालयाने २० मेपर्यंत अटकपूर्ण जामीन मंजूर केला होता. त्यासह तपास अधिकारी, सरकारी पक्ष आणि वाघोली पोलिसांना भूमिका मांडण्याचे निर्देश दिले होते. तपासादरम्यान लवांडेंनी अटकपूर्व जामिनाच्या अर्जात स्वत:विरोधातील पूर्वी दाखल असलेल्या ४ गुन्ह्यांची माहिती लपविल्याचं समोर आले होते. यानंतर सरकारी वकील राजेश कावेडिया यांनी न्यायालयात आक्षेप घेत लवांडेंचे संरक्षण रद्द करण्याची मागणी केली होती. न्यायालयाने हा युक्तिवाद ग्राह्य धरत त्यांचा अटकपूर्व जामीन रद्द केला होता. न्यायालयाच्या निर्णयानंतर पोलिसांनी लागलीच लवांडेंना अटक केली आहे.

# फरार आरोपीला हैद्राबादमधून पोलीसांनी केली अटक

नांदेड/प्रतिनिधी-भाग्यनगर पोलीस स्टेशनमध्ये दाखल असलेल्या गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपीला स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी बुधवारी हैद्राबादमधून अटक केली आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाकडून फरार आरोपीचा शोध सुरु करण्यात आला होता. भाग्यनगर पोलीस ठाण्यात गंभीर गुन्ह्यातील फरार असलेला आरोपी इलियास उर्फ काला इलू इस्माईल खान (वय ३३) रा.टायरबोर्ड, खुदबेनगर,नांदेड हा हैद्राबादमध्ये राहत असल्याची माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांना मिळाली. पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरिक्षक विठ्ठल घोगरे व पोलीस कर्मचाऱ्यांनी बुधवार दि.२० मे रोजी सापळा रचून हैद्राबाद शहरातील शमशाबाद भागात इलियास उर्फ काला इलू यास अटक केली.



नांदेड शहरातील प्रमुख बाजारपेठा पैकी एक असलेल्या तारासिंह मार्केट परिसरातील विद्युत डीपीला आग लागल्याने येथील विद्युत पुरवठा खंडीत झाला होता. (छाया : करणसिंह बैस)

# पाणीटंचाईसह प्रलंबित प्रश्नाकडे लोकप्रतिनिधींसह राजकीय नेत्यांचे दुर्लक्ष

देगलूर/प्रतिनिधी-जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक डोळ्यासमोर ठेवून काही महिन्यापूर्वी तालुक्यातील सर्कल मध्ये स्थानिक नेत्यांच्या बैठका, उद्घाटन सोहळे आणि गावभेटींची चढाओढ सुरू होती. भावी उमेदवार गावोगावी जाऊन कार्यकर्त्यांच्या बैठका घेत होते. मात्र निवडणुका लांबल्यानंतर अनेक स्थानिक नेत्यांनी या तालुक्याकडे पाठ फिरवल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाली आहे.

देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघातील हाणेगाव, नरखेड, करडखेड, शहापूर, खानापूर, मानूर या सर्कलमधील राजकीय दृष्ट्या महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे येथे नेहमीच विविध नेत्यांचे लक्ष असते. मात्र सध्या गावातील मूलभूत सुविधा व प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरीक व्यक्त करत आहेत. देगलूर तालुक्यामध्ये अनेक महिन्यापासून पाणीटंचाई निर्माण झाले असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. तरीही कोणत्याही लोकप्रतिनिधीने किंवा सबंध नेत्यांनी गावाला भेट देऊन समस्येची दखल घेतली नाही, याबद्दल नाराजी देगलर तालुक्यातील ग्रामस्थांमध्ये पसरली आहे.देगलूर तालुक्यामध्ये काम आहे. आमच्या पूर्ण झाले नाही.काही सामाजिक कार्यकर्त्यांनी आंदोलन करून प्रशासनावर निवेदन दिली होती. अनेक वृत्तवृत्पत्रातून प्रश्न मांडण्यात आले. मात्र त्यानंतर वृत्तपत्रातून प्रश्न निर्माण झाले होते. किंवा कोणत्याही लोकप्रतिनिधींनी प्रश्न मांडण्यात आले, मात्र त्यानंतर कोणतीही ठोस कारवाई झालेली दिसत नसल्याची चर्चा गावात सुरू आहे. गावातील पाणीटंचाई, प्रलंबित विकास कामे आणि नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडवण्यासाठी लोकप्रतिनिधींनी एकजुटीने काम करण्याची गरज असल्याचे मत तालुक्यातील ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

# निर्दयी मातेने पोटच्या दोन चिमुकल्यांची हत्या केल्या प्रकरणी न्यायालयाने ठोठावली ५ वर्ष कारावासाची शिक्षा

भोकर/प्रतिनिधी-जन्मदात्या आईनेच आपल्या दोन पोटच्या गोळ्यांना ४ महिने व २ वर्ष वय असलेल्या बालकांना तोंड दाबून मारून पुरून टाकल्याप्रकरणी भोकर अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयाने त्या निर्दयी आईला पाच वर्ष कठोर कारावास व १ हजार रु. दंडाची शिक्षा २० मे २०२६ रोजी सुनावली.

३१ मे २०२२ रोजी २०२२ मध्ये पांडुर्णा ता. भोकर येथील रहिवासी धुरपतबाई गणपत निमलवाड (वय २९ वर्ष) हिने आपल्या दोन छोट्या बालकांना घेऊन घरातून निघून गेली ४ महिन्याची मुलगी अनुसया व २ वर्षाचा मुलगा दत्ता हे सोबत होते ते भुकेने व्याकुळ होऊन रडत असल्यामुळे अनुसया हिचे तोंड दाबून जिवे मारून पांडुरना येथील पुलाखाली मातीत पुरून टाकले मुलगा दत्ता यास नाका तोंडात चिखल टाकून जीवे मारून मुगट शिवारात माता साहेब गुरुद्वारा समोरील उसाच्या शेतात आनंद रस्त्याचा टाकून दिले आरोपीची आई कोंडाबाई भाऊ माधव यांच्या मदतीने दोन्ही मुलांचे प्रेत पांडुर्णा येथे आणून आरोपी धुरपत बाईचे सासरे गोविंद निमलवाड यांच्या शेतात आणून जाळून टाकले त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली गोविंद निमलवाड यांच्या फिर्यादीवरून भोकर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला तपास करून पोलीस उपनिरीक्षक दिगंबर पाटील यांनी दोषारोप पत्र न्यायालयात दाखल केले या प्रकरणात सरकार पक्षाच्या वतीने अतिरिक्त सरकारी अभिवोक्ता सौ.अनुराधा रेड्डी डावकरे यांनी महत्त्वाचे सहा साक्षीदार तपासून पुरावा सिद्ध केला व उच्च न्यायालयातील न्याय निवाडे दाखल केले युक्तिवाद करून संपूर्ण शिक्षा देण्याची न्यायालयाला विनंती केली जिल्हा सत्र न्यायाधीश मोहम्मद नासिर मोहम्मद सलीम यांनी तिच्या मानसिक आजाराचा व वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या प्रमाणपत्राचा विचार करून आई मनोरुग्ण असल्यामुळे तिला कलम ३०२ अंतर्गत शिक्षा वगळून ३०४ (२) अंतर्गत ५ वर्षाची कठोर शिक्षा व १ हजार रु. दंड कलम २०१ अंतर्गत २ वर्ष शिक्षा व १ हजार रु. दंड अशी शिक्षा सुनावली या खटल्याच्या कामी कोर्ट पैरवी फिरोज खान पठाण यांनी मदत केली.

# कंधारमध्ये मटका अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-कंधार शहरातील संभाजीनगर भागात सुरु असलेल्या मटका अड्डयावर बुधवारी दुपारी कंधार पोलीसांनी धाड टाकुन एका जणांस अटक केली.

कंधार शहरातील संभाजीनगर भागात खुलेआमपणे मटका अड्डा सुरु होता. बुधवारी दुपारी फौजदार स्नेहा पिंपरखेडे यांच्या नेतृत्वाखाली पोलीसाच्या एका पथकाने मटका अड्डयावर धाड टाकली. लोकांकडून पैसे घेवून टाईम बाजार, मिलन डे, कल्याण नावाचा मटका खेळवीत असतांना आनंदसिंह गोविंदसिंह सदिवाल (वय ३१) रा.संभाजीनगर, कंधार यास पोलीसांनी अटक केली. त्याच्याकडून रोख रक्कम, जुगाराचे साहित्य असा ११ हजार रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला. या प्रकरणी कंधार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# भीम आर्मीच्या पदाधिकाऱ्यांचा वंचित मध्ये प्रवेश

उमरी/प्रतिनिधी-उमरी येथे बुधवारी आयोजित पक्षप्रवेश सोहळ्यात भीम आर्मीच्या अनेक पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी माजी खा.अॅड. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत वंचित बहुजन आघाडीमध्ये जाहीर प्रवेश केला. या कार्यक्रमामुळे उमरी तालुक्यात वंचित बहुजन आघाडीच्या संघटनात्मक बळात वाढ झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

उमरी येथील सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान युवा आघाडीचे प्रदेश सदस्य अक्षयभाऊ बनसोडे यांनी भूषविले. यावेळी वंचित बहुजन आघाडी नांदेड दक्षिणचे जिल्हाध्यक्ष शंकरजी महाजन, जिल्हा उपाध्यक्ष अरुण भद्रे तसेच युवा आघाडी जिल्हा संघटक संदेश गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.या पक्षप्रवेश सोहळ्यात भीम आर्मीचे जिल्हा सचिव संदीप लांडगे, गंगाधर गंगासागरे यांच्यासह सुरज डोंगरे, बाबासाहेब सोनटक्के, बुद्धतेज डोंगरे, संघर्ष जोंधळे, सिद्धार्थ खंदारे, रवी लोखंडे, विकास खंदारे आदी पदाधिकारी व युवकांनी वंचित बहुजन आघाडीत प्रवेश केला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सामाजिक न्याय, बहुजन एकजूट आणि युवकांच्या सहभागातून संघटना अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या पक्षप्रवेशाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. कार्यक्रमास गंगाधर लांडगे, डी.जी. तुपसाखरे, करुणा खंडेलोटे, आनंदराव पवार, सरपंच पोषट्टी पोलासवाड, सरपंच बालाजी वाघमारे, भीमराव वाघमारे, सय्यद इलियास, मारोती जाधव, शेख रफिक, अशोक कांबळे, आर्यन लांडगे, विकास डुमने आदींसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पान १ वरुन

## नीट पेपरफुटी प्रकरणी...

काही महत्त्वाची कागदपत्रेही जप्त करण्यात आली असून, बँक खात्यांची चौकशी सुरू करण्यात आली आहे. आर्थिक देवाणघेवाणीचे पुरावे मिळतात का, याकडे तपास यंत्रणांचे लक्ष लागले आहे. नीट पेपरफुटी प्रकरणातील ही कारवाई अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, पुढील काही दिवसांत आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## शेतकऱ्यांची ३० जूनपूर्वी...

मागणी करू नये. बँकांच्या मुख्यालयांनी प्रत्येक शाखेला याबाबत पत्र पाठवले पाहिजे. या पत्रात क्रॉप लोनसाठी सिबीलची अट नाही. आमच्या बैठकीत आरबीआयचे अधिकारी होते. त्यांनीही याबाबत पुष्टी केलेली आहे. कुठल्याही क्रॉपलोनसाठी कोणत्याही शेतकऱ्याची अडवणूक करायची नाही, असा आदेश देण्यात आलेला आहे, अशी माहिती फडणवीस यांनी दिली आहे.

## रेल्वे भरती आंदोलन प्रकरणी...

आंदोलन करण्यात आले, असा आरोप सरकारी पक्षाकडून करण्यात आला होता. राज ठाकरे यांच्या भाषणातून तरुणांना चिथावणी मिळाल्याचा ठपकाही ठेवण्यात आला होता.मात्र, न्यायालयीन सुनावणीदरम्यान राज ठाकरे यांनी सर्व आरोप फेटाळले. मी घटनास्थळी उपस्थित नव्हतो. माझ्यावर दाखल झालेले गुन्हे खोटे असून मी निर्दोष आहे, असे त्यांनी न्यायालयात स्पष्ट केले होते. त्यांच्या विरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम १५३, १५३-अ, दंगल, मारहाण, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान यांसह विविध गंभीर कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले होते.

## काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी...

जिल्हाध्यक्ष बदलण्याचे संकेत दिले होते. बुधवारी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने महाराष्ट्रातील जिल्हाध्यक्षांची नियुक्ती जाहीर केली. नांदेड उत्तर विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी तरुण व निष्ठावंत कार्यकर्ते विठ्ठल पावडे यांची तर नांदेड दक्षिणच्या जिल्हाध्यक्षपदी खा.रविंद्र चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महानगर अध्यक्ष पदावर माजी उपमहापौर अब्दुल यांची निवड करण्यात आली आहे.

# देश संकटात,पण आयपीएल मात्र सुरुच-सुजित मानकामे

उमरखेड/प्रतिनिधी- देशातील वाढती महागाई, इंधन दरवाढ आणि जीवनावश्यक वस्तूंच्या तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर आयपीएल स्पर्धा सुरू ठेवण्याबाबत युवक काँग्रेसने गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. युवक काँग्रेसचे यवतमाळ जिल्हा महासचिव सुजित विजय मानकामे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात केला आहे.



सामान्य जनता पेट्रोल, डिझेल, गॅस दरवाढ, बेरोजगारी आणि महागाईमुळे आर्थिक अडचणीत सापडली आहे. अनेक कुटुंबांना दैनंदिन गरजा भागवणे कठीण झाले असून वीज, पाणी आणि इंधनाची टंचाई भासत आहे. अशा परिस्थितीत आयपीएल सामन्यांसाठी भव्य स्टेडियम, हायमास्ट लाईट्स, एसी व्यवस्था, मोठे स्क्रीन आणि जाहिरातींवर प्रचंड खर्च केला जात असल्याची टीका करण्यात आली आहे.देशाची सुरक्षा, जनहित आणि संसाधनांचे योग्य नियोजन हे सरकारचे प्रथम कर्तव्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच नागरिकांनी जागृत होऊन प्रश्न विचारावेत आणि देशहितासाठी आवाज उठवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

# कॉकरोच जनता पार्टीचे सोशल मीडिया अकाऊंट बॅन

मुंबई/प्रतिनिधी-कॉकरोच जनता पार्टीचा सोशल मीडियावर धुमाकूळ सुरू असतानाच एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. सीजेपीचे सोशल मीडिया अकाऊंट बंद करण्यात आले आहे. सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी स्वत: यासंदर्भात माहिती दिली आहे. भारतातील स्थानिक नियम, न्यायालयाचे आदेश किंवा कायदेशीर तक्रारींच्या आधारे ही कारवाई करण्यात आल्याची माहिती इन्टाग्रामकडून देण्यात आली आहे. संस्थापक अभिजीत दीपके यांनीही त्यांच्या सोशल मीडिया खात्यावरून सीजेपीच्या खात्यावरील बंदीची घोषणा केली.

सीजेपीने सहा दिवसांत सोशल मीडियावर लाखो फॉलोअर्स मिळवले. सरन्यायाधीश सुर्यकांत यांच्या देशातील तरुणांबाबत केलेल्या वक्तव्यानंतर देशात कॉकरोच जनता पार्टीची मोहिम सुरू झाली. बघता बघता अवघ्या सहा दिवसांतच भाजपपेक्षाही जास्त तरूण या मोहिमेत सहभागी झाले. देशातील सत्ताधारी भाजप विरोधात देशभरात कॉकरोच जनता पार्टीने रान उठवले. पण नुकत्याच हाती आलेल्या बातमीनुसार कॉकरोच जनता पार्टीचे सोशल मीडिया अकाऊंट बॅन करण्यात आले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी दुपारी पर्यंत, इंस्टाग्रामवर ही संख्या १.२६ कोटींवर पोहोचली होती. भाजपचे ८७ लाख फॉलोअर्स आहेत, तर काँग्रेसचे १.३३ कोटी फॉलोअर्स आहेत.दुपारी १२ वाजता, पक्षाचे इंस्टाग्रामवर अंदाजे १,९३,००० फॉलोअर्स होते, पण आता इंस्टाग्रामने भारतातील पक्षाचे खाते बंद केले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४